http://www.sgbauonline.com/



# M.A. (Part–II) Semester–III Examination
## MARATHI
## Paper—IV
## (B) Dalit Sahitya

वेळ : 3 तास] [एकूण गुण : 80

सूचना :—(1) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

(2) वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे एकापेक्षा अधिक वेळा लिहिल्यास पहिले उत्तर मूल्यांकनासाठी ग्राह्य धरण्यात येईल.

1. दलित साहित्य आणि दलितमुक्तीची चळवळ यातील अनुबंध स्पष्ट करा.

किंवा

दलित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या विद्रोहाचे स्वरूप स्पष्ट करा.

2. 'जिणं आमुचं' मधून केवळ बेबी कांबळे यांचे जीवन येत नाही तर दलित समाजाच्या सुख-दुःखांचे व आशा-आकांक्षेचे व्यापक रूप व्यक्त होते' हे विधान पटवून द्या.

किंवा

'नामदेव ढसाळ यांची कविता शतकानुशतकाच्या विषमतावादी व्यवस्थे विरुद्ध विद्रोह पुकारते' या विधानाची 'गोलपिठा'तील कवितांच्या आधारे चर्चा करा.

3. 'बाबूराव बागूल यांच्या कथालेखनाची भाषा अतिशय समर्पक आहे.' हे विधान उदाहरणांसह पटवून द्या.

किंवा

'माकडीचा माळ' मध्ये भटक्या समाजाच्या दारिद्र्यावस्थेचे वास्तव अधोरेखित झाले आहे' हे विधान पटवून द्या.

4. 'जिणं आमुचं' मध्ये दलितांच्या अंतर्गत ताण-तणावांचे चित्रण आले आहे' या विधानाची चर्चा करा.

किंवा

'माकडीचा माळ' मध्ये भटक्या समाजाच्या अंतर्गत संघर्षाचे चित्रण आले आहे' हे विधान पटवून द्या.

5. पुढील वस्तुनिष्ठ प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा (उदा. : 2 (क) रा. चिं. ढेरे) :—

(1) 'गोलपिठा' या काव्यसंग्रहाला .............. यांनी प्रस्तावना लिहिली आहे.

(अ) रा.भा. पारणकर (ब) अक्षयकुमार काळे

(क) नागनाथ कोत्तापल्ले (ड) विजय तेंडुलकर

(2) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळ्याचा सत्याग्रह केला कारण ..............

(अ) दलितांना त्यांच्या हक्काची जाणीव करून द्यायची होती

(ब) दलितांना पिण्यासाठी पाणी द्यायचे होते

(क) दलितांच्या शेतीला पाणी हवे होते

(ड) तळ्यातल्या चवदार पाण्याचा वाटा हवा होता.



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

(3) 'माकडीचा माळ' मधील यनूचे वडील कोण ........... ...

(अ) यकू (ब) सख्या

(क) बाळया (ड) पाऱ्या

(4) अण्णा भाऊ साठे यांचे सहकारी ..............

(अ) शाहीर अमरशेख (ब) चंद्रकांत ढवळपुरीकर

(क) काळू-बाळू (ड) नामदेव ढसाळ

(5) ''सोळाव्या वाटयाचा धनी म्हणजे आजचा जज्जही त्याच्या पुढं फिका'' हे वाक्य कोणत्या कलाकृतीतील आहे.

(अ) मरण स्वस्त होत आहे (ब) माकडीचा माळ

(क) जिणं आमुचं (ड) गोलपिठा

(6) अण्णा भाऊ साठे यांचे नाव ................

(अ) तुकाराम भाऊ साठे (ब) सिधोजी भाऊ साठे

(क) ग्यानोजी भाऊ साठे (ड) रंगाजी भाऊ साठे

(7) 'माकडीचा माळ' मधील गुल्लीचे वडील कोण ................

(अ) पर्बती डवऱ्या (ब) हिकम्या गारूडी

(क) सख्या माकडवाला (ड) बाळया डोंबारी

(8) बाबूराव बागूल यांच्या 'सक्तमजुरी' या कथेतील ''मारतोस का ? जेलमधे ने.....तेरे बाप का राज है.......तू खाना खिलाता है......?'' हे वाक्य कोणाच्या तोंडचे आहे.

(अ) दानियल (ब) सिकंदर

(क) फर्नांडिस (ड) कासम अल्ली



http://www.sgbauonline.com/